माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ या दोन महिन्यात मुदत
ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दोन टप्प्यांतील
निवडणूक कार्यक्रम-
सरपंच पदासह सर्व सदस्य पदासाठी.
आचारसंहिता आज दि.०१/०९/२०१७ रोजी दुपारी ४.०० पासून लागु.

निवडणूक तात्काळ
ई-मेलव्दारे

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८


नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in


दिनांक: ०१ सप्टेंबर २०१७

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)*

विषय :- माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ या दोन महिन्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दोन टप्प्यांतील निवडणूक कार्यक्रम- सर्व सदस्य व सरपंच पदासाठी.

संदर्भ :-
१) प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम-आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१६/प्र.क्र.७/का-८, दि.०१/०६/२०१६
२) मतदार यादीचे कार्यक्रम- आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.६/का-८, दि.०७/०७/२०१७, (सुधारीत- दि.१९/०८/२०१७ व दि.२२/०८/२०१७)
३) ग्रामपंचायत निवडणुकांची पूर्वतयारीबाबतचे आदेश- आयोगाचे क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१६/का-८, दि.१४/०८/२०१७
४) शासनाचा सरपंच निवडणूका थेट घेण्याबाबतचा दिनांक १९ जुलै, २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश.
५) माहे ऑक्टोबर २०१७ या कालावधीत मुदती संपणाऱ्या ११४ ग्रामपंचायतीसाठी निवडणूक कार्यक्रम-आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८, दि.२१/०८/२०१७
६) दि.२९/८/२०१७ रोजी जिल्हाधिकारी (सर्व).यांच्यासोबत घेण्यात आलेली व्ही.सी.

महोदय/महोदया,

आपल्याला माहितच आहे की, ऑक्टोबर, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ८५०० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका संविधानातील तरतुदीनुसार त्यांची मुदत संपण्यापूर्वी घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेश क्र.१ द्वारे प्रभाग रचना व

माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ या दोन महिन्यात [illegible]
ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दोन टप्प्यांतील
निवडणूक कार्यक्रम-
सरपंच पदासह सर्व सदस्य पदासाठी.
आचारसंहिता आज दि.०१/०९/२०१७ रोजी दुपारी ४.०० पासून लागू.

निवडणूक तात्काळ
ई-मेलव्दारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in

दिनांक: ०१ सप्टेंबर २०१७

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)*

विषय :- माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ या दोन महिन्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दोन टप्प्यांतील निवडणूक कार्यक्रम- सर्व सदस्य व सरपंच पदासाठी.

संदर्भ :- १) प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम-आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१६/प्र.क्र.७/का-८, दि.०१/०६/२०१६

२) मतदार यादीचे कार्यक्रम- आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.६/का-८, दि.०७/०७/२०१७, (सुधारीत- दि.१९/०८/२०१७ व दि.२२/०८/२०१७)

३) ग्रामपंचायत निवडणुकांची पूर्वतयारीबाबतचे आदेश- आयोगाचे क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१६/का-८, दि.१४/०८/२०१७

४) शासनाचा सरपंच निवडणूका थेट घेण्याबाबतचा दिनांक १९ जुलै, २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश.

५) माहे ऑक्टोबर २०१७ या कालावधीत मुदती संपणाऱ्या ११४ ग्रामपंचायतीसाठी निवडणूक कार्यक्रम-आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८, दि.२१/०८/२०१७

६) दि.२९/८/२०१७ रोजी जिल्हाधिकारी (सर्व).यांच्यासोबत घेण्यात आलेली व्ही.सी.

महोदय/महोदया,

आपल्याला माहितच आहे की, ऑक्टोबर, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ८५०० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका संविधानातील तरतुदीनुसार त्यांची मुदत संपण्यापूर्वी घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेश क.१ द्वारे प्रभाग रचना व

आरक्षणाचा कार्यक्रम व संदर्भ क्रमांक २ द्वारे मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केलेला होता. या आदेशाच्या अनुषंगाने प्रभाग रचना व आरक्षणाची कार्यवाही पूर्ण झाली असून प्रभागनिहाय मतदार याद्या विभाजनाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

२. माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ११४ ग्रामपंचायतींच्या (वरील सुमारे ८५००पैकी) सार्वत्रिक निवडणुका त्यांची मुदत संपण्यापूर्वी घेणे आवश्यक असल्याने, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भ क्र.५ द्वारे निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून सर्व सदस्य व सरपंच पदासाठी मतदान दि.२३ सप्टेंबर, २०१७ रोजी होणार आहे.

३. आता नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ या दोन महिन्यात मुदत संपणाऱ्या सुमारे ७५७६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा (सर्व सदस्य व सरपंच पदासाठी) कार्यक्रम खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. जानेवारी व फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ६८९ व नव्याने स्थापित झालेल्या ३७ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम अलाहिदा देण्यात येईल.

## आदेश

४. नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ या दोन महिन्यात मुदत संपणाऱ्या (सुमारे ७,५७६) ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका खाली दर्शविलेल्याप्रमाणे दोन टप्प्यांत घेण्यात याव्यात.

(i) **टप्पा क्रमांक १ - कार्यक्रम परिशिष्ट-अ १ व जिल्ह्यांची यादी परिशिष्ट- अ २.**
या ग्रामपंचायतींचा नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा कालावधी दिनांक १५/०९/२०१७ ते दिनांक २२/०९/२०१७ व मतदानाचा दिनांक ७ ऑक्टोबर २०१७ असा राहील.

(ii) **टप्पा क्रमांक २ - कार्यक्रम परिशिष्ट-ब १ व जिल्ह्यांची यादी परिशिष्ट-ब २.**
या ग्रामपंचायतींचा नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा कालावधी दिनांक २२/०९/२०१७ ते दिनांक २९/०९/२०१७ व मतदानाचा दिनांक १४ ऑक्टोबर २०१७ असा राहील.

५. जिल्हाधिकारी यांनी नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती तसेच जानेवारी व फेब्रुवारी, २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची यादी वेगवेगळी करावी. यात चुका होता कामा नये.

६. या निवडणुकीमध्ये प्रथमत: सरपंच पद थेट पध्दतीने निवडून द्यावयाचे असल्याने निवडणूक आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत विशेष उपाययोजना करावी. तसेच प्रत्यक्ष मतमोजणीच्या वेळी संवेदनशील मतमोजणी केंद्राच्या परिसरात विशेष पोलीस बंदोबस्त पुरविण्याची दक्षता घेण्यात यावी.

७. सोबतच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे **फक्त गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरीता मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० अशी राहील व इतर सर्व संबंधित जिल्ह्यांत मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.**

८. शासनाच्या क्र.व्हिपीएस-११६४/२८६१३/ई. दि. ०६ फेब्रुवारी, १९६५ च्या शासन निर्णयानुसार शनिवार दिनांक ०७/१०/२०१७ व शनिवार दि.१४/१०/२०१७ हे मतदानाचे दिवस कार्यालयीन कामकाजाचे दिवस असल्याने या दिवशी सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम लागू असलेल्या क्षेत्रात, जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावर मतदानाकरीता स्थानिक सुट्टी जाहीर करावी.

९. निवडणूक कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भात न्यायालयाचे स्थगिती किंवा तत्सम आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर लगेच कार्यवाही करुन त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. याबाबतची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

१०. आदर्श आचारसंहिता-

१०.१ सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये आज दुपारी ४.०० वाजेपासून आचारसंहिता लागू झाली असून, ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील.

१०.२ निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणामध्ये होणे आवश्यक असल्याने, राज्य निवडणूक आयोगाने दि.१४/१०/२०१६ रोजी आदर्श आचारसंहिता विषयक निर्गमित केलेल्या आदेशातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१०.३ आचार संहिता खालील ग्रामीण क्षेत्रामध्ये लागू राहील:

अ) ज्या जिल्ह्यामध्ये ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका आहेत, त्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये आचारसंहिता लागू राहील.

ब) ज्या तालुक्यात ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका आहेत, त्या संपूर्ण तालुक्यात आचारसंहिता लागू राहील.

क) निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींच्या सीमेलगतच्या गावांमध्येसुध्दा आचारसंहिता लागू राहील.

१०.४ आदर्श आचारसंहिता जरी संपूर्ण जिल्हा/तालुका/लगतच्या गावामध्ये लागू असेल, तरी जेथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये निवडणुका नसतील, त्या ठिकाणी विकासाच्या विविध कामांवर कसलाही निर्बंध राहणार नाही. मात्र या क्षेत्रात अशी कोणतीही कृती कोणालाही करता येणार नाही, ज्यामुळे निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या मतदारांवर विपरित प्रभाव पडेल.

११. **राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे :-**

| | |
|---|---|
| संकेतस्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी कमांक | ०२२-२२८४६७२०, २२८८६९५०,२२०४५०७५ |
| ई मेल ॲड्रेस | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या वर नमूद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

सोबत- परिशिष्टे - अ १, अ२ व ब१, ब२

( री. वि. फणसेकर )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत : १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वित्त विभाग, सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. **प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
यांना कळविण्यात येत आहे की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काल उपलब्ध करून द्यावे.
६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.

७. **संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.**

यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

८. पोलीस महानिरीक्षक (सर्व), महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व)

११. सहायक आयुक्त, संगणकीकरण शाखा, रानिआ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना उचित कार्यवाहीसाठी.

१३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने

१४. निवड नस्ती (२ प्रती).

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८, दि.०१/०९/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

| |
|---|
| परिशिष्ट-अ १ |
| टप्पा क्र.१ |
| मतदान दि.०७/१०/२०१७ |
| आचारसंहिता आज दि.०१/०९/२०१७ रोजी दुपारी ४.०० पासून लागू. |

माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ या दोन महिन्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम- सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी.

नाशिक, औरंगाबाद व अमरावती महसूल विभागातील सर्व जिल्ह्यांकरिता

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.०७/०९/२०१७ (गुरूवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१५/०९/२०१७ (शुक्रवार) ते दि.२२/०९/२०१७ (शुक्रवार) वेळ स. ११.०० ते दु. ४.३० *(दि.१७/०९/२०१७ व ज्या जिल्ह्यात दि.२१/०९/२०१७ रोजी सार्वजनिक सुट्टी असेल तो दिवस वगळून)* |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.२५/०९/२०१७ (सोमवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.२७/०९/२०१७ (बुधवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.२७/०९/२०१७ (बुधवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | **दि.०७/१०/२०१७ (शनिवार)** स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.०९/१०/२०१७ (सोमवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दि.११/१०/२०१७ (बुधवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८, दि.०१/०९/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

| परिशिष्ट-अ २ |
| --- |
| टप्पा क्र.१ |
| मतदान दि.०७/१०/२०१७ |
| आचारसंहिता आज दि.०१/०९/२०१७ रोजी दुपारी ४.०० पासून लागू. |

## माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ या दोन महिन्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणुकीचा जिल्हानिहाय तपशील

## नाशिक, औरंगाबाद व अमरावती महसूल विभागातील सर्व जिल्हे

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायत संख्या |
| --- | --- | --- | --- |
| १ | नाशिक | नाशिक | १७० |
| २ | | धुळे | १०८ |
| ३ | | जळगाव | १३८ |
| ४ | | नंदुरबार | ५१ |
| ५ | | अहमदनगर | २०४ |
| **नाशिक विभाग एकूण** | | | **६७१** |
| ६ | औरंगाबाद | औरंगाबाद | २१२ |
| ७ | | बीड | ७०३ |
| ८ | | नांदेड | १७१ |
| ९ | | परभणी | १२६ |
| १० | | उस्मानाबाद | १६५ |
| ११ | | जालना | २४० |
| १२ | | लातूर | ३५३ |
| १३ | | हिंगोली | ४९ |
| **औरंगाबाद विभाग एकूण** | | | **२,०१९** |
| १४ | अमरावती | अमरावती | २६२ |
| १५ | | अकोला | २७२ |
| १६ | | यवतमाळ | ९३ |
| १७ | | वाशीम | २८७ |
| १८ | | बुलडाणा | २८० |
| **अमरावती विभाग एकूण** | | | **१,१९४** |
| **एकूण** | | | **३,८८४** |

(क्रमांक:रानिआ/ग्रापनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८, दि.०१/०९/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

| |
|---|
| परिशिष्ट -ब १ |
| टप्पा क्र.२ |
| मतदान दि.१४/१०/२०१७ |
| आचारसंहिता आज दि.०१/०९/२०१७ रोजी दुपारी ४.०० पासून लागू. |

माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ या दोन महिन्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम- सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी.

कोकण, पुणे व नागपूर महसूल विभागातील सर्व जिल्ह्यांकरिता

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.१४/०९/२०१७ (गुरूवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.२२/०९/२०१७ (शुक्रवार) ते दि.२९/०९/२०१७ (शुक्रवार) वेळ स. ११.०० ते दु. ४.३० *(दि.२३/०९/२०१७ व दि.२४/०९/२०१७ हे सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून)* |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०३/१०/२०१७ (मंगळवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०५/१०/२०१७ (गुरूवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.०५/१०/२०१७ (गुरूवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.१४/१०/२०१७ (शनिवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत *(गडचिरोली जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)* |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.१६/१०/२०१७ (सोमवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दि.१७/१०/२०१७ (मंगळवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८, दि.०१/०९/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

| |
|---|
| परिशिष्ट-ब २ |
| टप्पा क्र.२ |
| मतदान दि.१४/१०/२०१७ |
| आचारसंहिता आज दि.०१/०९/२०१७ रोजी दुपारी ४.०० पासून लागू. |

## माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ या दोन महिन्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणुकीचा जिल्हानिहाय तपशील

### कोकण, पुणे व नागपूर महसूल विभागातील सर्व जिल्हे

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायत संख्या |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | ४१ |
| २ | | पालघर | ५६ |
| ३ | | रायगड | २४२ |
| ४ | | रत्नागिरी | २२२ |
| ५ | | सिंधुदुर्ग | ३२५ |
| | **कोकण विभाग एकूण** | | **८८६** |
| ६ | पुणे | पुणे | २२१ |
| ७ | | सोलापूर | १९२ |
| ८ | | सातारा | ३१९ |
| ९ | | सांगली | ४५३ |
| १० | | कोल्हापूर | ४७८ |
| | **पुणे विभाग एकूण** | | **१,६६३** |
| ११ | नागपूर | नागपूर | २३८ |
| १२ | | वर्धा | ११२ |
| १३ | | चंद्रपूर | ५२ |
| १४ | | भंडारा | ३६२ |
| १५ | | गोंदिया | ३५३ |
| १६ | | गडचिरोली | २६ |
| | **नागपूर विभाग एकूण** | | **१,१४३** |
| | **एकूण** | | **३,६९२** |

निवडणूक तात्काळ
ई-मेलव्दारे

माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी अंशत: सुधारीत निवडणूक कार्यक्रम- सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in
दिनांक: ०७ सप्टेंबर २०१७

प्रति,
जिल्हाधिकारी,
पालघर, नाशिक, नंदुरबार, पुणे, औरंगाबाद, नांदेड, उस्मानाबाद,
जालना, हिंगोली, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली.

**विषय :-** माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी अंशत: सुधारीत निवडणूक कार्यक्रम- सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी

**संदर्भ :-** १) आयोगाचा समक्रमांकाचा दि.२१ ऑगस्ट २०१७ रोजीचा निवडणूक कार्यक्रम.
२) आपले दि.०७/०९/२०१७ रोजीचे अहवाल.

महोदय/महोदया,

वरील विषयाबाबत संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, तांत्रिक कारणामुळे आपण विनंती केल्यानुसार, सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी निवडणुकीचा अंशत: सुधारीत कार्यक्रम सोबत परिशिष्ट-अ मध्ये जोडण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत दि.२१ ऑगस्ट २०१७ रोजीच्या निवडणूक कार्यक्रमातील निर्देश लागू होतील.

सदर अंशत: सुधारीत निवडणूक कार्यक्रमास स्थानिक पातळीवर व्यापक प्रसिध्दी द्यावी, ही विनंती.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत- परिशिष्ट- अ

**प्रत :** १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वित्त विभाग, सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**यांना कळविण्यात येत आहे की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावे.**

६. विभागीय आयुक्त (सर्व) **यांना** उचित कार्यवाहीसाठी.

**७. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.**

**यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक** साधनसामग्री पुरविण्यात यावी. **तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था** करावी.

८. पोलीस महानिरीक्षक (सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबंधित)

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व संबंधित)

११. सहायक आयुक्त, संगणकीकरण शाखा, रानिआ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना उचित कार्यवाहीसाठी.

१३. राज्य निवडणूक आयोगाची सर्व कार्यासने

१४. निवड नस्ती (२ प्रती).

*(क्रमांक : रानिआ/ग्रापनि/२०१७/प्र.क्र.१७/का-८, दिनांक ०७/०९/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

*परीशिष्ट-अ*

## राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी अंशत: सुधारीत निवडणूक कार्यक्रम- सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२४/०८/२०१७ (गुरूवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०४/०९/२०१७ (सोमवार) ते दि.११/०९/२०१७ (सोमवार) वेळ स. ११.०० ते दु. ५.३० *(दि.०९/०९/२०१७ व दि.१०/०९/२०१७ सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून)* |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१२/०९/२०१७ (मंगळवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१४/०९/२०१७ (गुरूवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.१४/०९/२०१७ (गुरूवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.२६/०९/२०१७ (मंगळवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत *(गडचिरोली जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)* |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.२७/०९/२०१७ (बुधवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दि.२७/०९/२०१७ (बुधवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( री. वि. फणसेकर )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र